# प्रेस नोट

दि.२३/०८/२०१९

दि.२३/०८/२०१९ रोजी शिवाजीनगर पोलीस मुख्यालय येथे सकाळी ०७.१५ वा. विशेष समारंभीय परेडचे आयोजन करण्यात आले होते. परेडची मानवंदना मा.डॉ.के. व्यंकटेशम्, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी स्विकारली.

परेडचे संचलन संपलेनंतर गडचिरोली, चंद्रपूर, गोदिंया या नक्षलग्रस्त भागात काम केलेल्या पोलीस अधिकारी यांना त्यांचे **"खडतर सेवेबद्दल विशेष सेवा पदक"** प्राप्त झालेल्या एकूण ४१ पोलीस अधिकारी यांना त्यांचे नातेवाईकांचे उपस्थितीत मा.डॉ.के.व्यंकटेशम्, पोलीस आयुक्त यांचे हस्ते विशेष सेवा पदक प्रदान करुन गौरविण्यात आले.

सदर वेळी सह पोलीस आयुक्त डॉ.रविंद्र शिसवे, अपोआ डॉ.संजय शिंदे, श्री.श्रीकांत तरवडे, सर्व पोलीस उप आयुक्त, सर्व सहायक पोलीस आयुक्त, सर्व वरिष्ठ पोलीस निरीक्षक व पदक प्राप्त अधिकारी व त्यांचे नातेवाईक उपस्थित होते.

**(कल्याणराव विधाते)**
सहायक पोलीस आयुक्त,
मानव संसाधन विभाग, पुणे शहर